**प्रेस नोट** **दि.२७/०३/२०१९**

## शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर

## घरातुन निघुन आलेल्या अल्पवयीन मुलीस तिचे आई-वडीलांचे ताब्यात दिलेबाबत

दिनांक २५/०३/२०१९ रोजी पो शि रासकर यांनी शिवाजीनगर एस.टी.स्टँड येथे एक १२ ते १३ वर्षांची मुलगी रडत बसलेली आहे अशी माहिती दिल्याने सपोनि रणजीत भोईटे यांनी सदरची माहिती हि श्री.बाळासाहेब कोपनर वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजीनगर पो.स्टे यांना कळवुन पोउनि चव्हाण व मपोना पुकाळे यांना शिवाजीनगर एस.टी.स्टँड येथे रवाना केले पोउनि चव्हाण व मपोना पुकाळे यांनी सदर मुलीस ताब्यात घेवुन पोलीस ठाणे येथे आणुन तीचेकडे मपोउनि झडते यांनी चौकशी केली असता तीने तिचे नाव सांगुन वय १३ वर्षे रा बालेवाडी असे असल्याचे सांगीतले व घरामध्ये दररोज होणा-या आई-वडीलांचे भांडणाला कंटाळुन सकाळी ०८.०० वा.घरातुन एकटीच चालत शिवाजीनगर एस.टी.स्टँड येथे आले असल्याचे सांगीतले.तिचेकडे आई-वडीलांचे फोन नंबर बाबत विचारणा केली असता फोन क्र.माहिती नसल्याचे सांगीतल्याने चतुःश्रृंगी पोलीस ठाणेशी संपर्क साधुन तेथील मार्शल करवी नमुद मुलीचे दिले पत्त्यावर पाठवुन ताब्यात घेण्यात आलेल्या मुलीच्या आईशी संपर्क साधुन त्यांना पोलीस ठाणे येथे बोलावुन घेतले त्याप्रमाणे तिची आई सौ.वंदना जगताप व मुलीचे मामा श्री.सुदाम जाधव रा. दिघी पुणे हे शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे हजर झाल्यानंतर ताब्यात घेण्यात आलेल्या मुलीला तिचे आई नामे सौ.वंदना जगताप हिचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

वरील नमुद कामगीरी हि बाळासाहेब कोपनर वरिष्ठ पोलीस निरीक्षक,बापु शिंदे पोलीस निरीक्षक,गुन्हे यांचे मार्गदर्शना खाली सपोनि रणजीत भोईटे,पोउनि संदिप चव्हाण,मपोना पुकाळे यांनी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर